# देशमुख, मेनन यांना 'पारखे पुरस्कार' जाहीर

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. ८ : नावीन्यपूर्ण वस्तू वा उत्पादनांसाठी देण्यात येणाऱ्या ''कै. गो. स. पारखे औद्योगिक मान पुरस्कारां''ची आज घोषणा करण्यात आली. यंदाच्या वर्षी ''चेतास कंट्रोल सिस्टिम्स''चे व्यवस्थापकीय संचालक महेश देशमुख आणि ''फ्लूइडाईन कंट्रोल सिस्टिम्स''चे शिवदास मेनन यांची निवड करण्यात आली आहे. ''हरिमालिनी जोशी पुरस्कारा''साठी ''रँड पॉलिप्रॉडक्ट्स''च्या डॉ. व्ही. एम. कुलकर्णी यांची, तर ''रमाबाई अनंत जोशी पुरस्कारा''साठी ''ओयकोस''च्या मानसी करंदीकर व केतकी घाटे यांची निवड करण्यात आली आहे.

श्री. देशमुख यांना ''अल्ट्रासॉनिक फ्लो-मीटर'' या उत्पादनासाठी, तर श्री. मेनन यांना ''फ्लीटलॉग'' या उत्पादनासाठी पुरस्कार देण्यात येत आहेत. पर्यावरण नियंत्रणासाठीच्या ''डॉ. आर. जे. राठी पुरस्कारा''साठी यंदा मिरज येथील ''सह्याद्री स्टार्च अँड इंडस्ट्रीज'' या कंपनीची निवड करण्यात आली आहे.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरतर्फे दरवर्षी हे पुरस्कार देण्यात येतात. या पुरस्कारांचे यंदाचे ५९ वे वर्ष आहे. पारखे पारितोषिक समन्वय समितीचे अध्यक्ष म. ग. साठे यांनी पुरस्कारांची घोषणा केली. मराठा चेंबरचे अध्यक्ष रवी पंडित; तसेच व्ही. व्ही. देवल उपस्थित होते.

आतापर्यंत सुमारे चारशे उद्योजकांना पारखे पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. पुरस्कारांसाठी यंदा सुमारे २७ अर्ज आले. त्यातून चार जणांची निवड करण्यात आली आहे. पुरस्कार वितरण १४ मे रोजी टिळक स्मारक मंदिर येथे होणार असून, ''फिनोलेक्स केबल्स''चे अध्यक्ष प्रल्हाद छाब्रिया प्रमुख पाहुणे असणार आहेत, अशी माहिती श्री. साठे यांनी दिली.

नवी उत्पादने तयार करणारे लघुउद्योजक; तसेच नावीन्यपूर्ण सेवा देणाऱ्या व्यावसायिक कंपन्या यांना हे पुरस्कार देण्यात येतात, असे ते म्हणाले.